# महाराष्ट्र परावैद्यक परिषद,मुंबई.

गेट क्र .०२, कामा व आल्बेस रुग्णालय, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत,महानगर पालिका मार्ग, धोबी तलाव, फोर्ट, मुंबई-४०० ००१

दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०

ई-मेल आयडी-mpmcmumbai2017@gmail.com

वेबसाइट-www.maharashtraparamedicalcouncil.org


---

क्र.मपवैप/आसे/पदभरती/ ३३७ /२०२२ दिनांक. २१.१२.२०२२

प्रती,
मान. डॉ. हेमंतकुमार बोरसे
उपसंचालक,आरोग्य सेवा,
मुंबई मंडळ, ठाणे,
प्रादेशिक मनोरुग्णालय आवार,
ठाणे (प) - ४००६०४.

विषय :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत.

संदर्भ :- १. जा.क्र.रआअ/पदभरती/LT/शैक्षणिक अर्हता/६५७६६-७०/२०२२, दि.१९.१२.२०२२

२. आपले पत्र दि. १९.१२.२०२२ चे पत्र दि. १९.१२.२०२२ रोजी ई-मेल द्वारा परिषदेस प्राप्त.

महोदय,

महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम २०११ मधील कलम २ (ज)मधे मान्यता प्राप्त परावैद्यकीय अर्हता याचा अर्थ महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक किंवा कायद्ययाद्वारे स्थापन केलेले इतर कोणतेही विद्यापीठ किंवा या बाबत राज्य शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतीही संस्था यांचेद्वारे देण्यात येणारी कोणत्याही परावैद्यकीय अर्हतेमधील पदवी, पदविका,प्रमाणपत्र किंवा पाठ्यक्रम मग तो कोणत्याही नावाने संबोधन्यात येवो, असा आहे, आणि परावैद्यक अर्हता याचा अर्थ शासन अधिनियम २०११ मधील कलम २ (घ) मधे नमुद केल्याप्रमाणे -अनुसूचिमधे विनिर्दिष्ट केलेली कोणतीही पदवी,पदविका,प्रमाणपत्र किंवा पाठ्यक्रम मग तो कोणत्याही नावाने संबोधन्यात येवो.

अधिनियमातील तरतुदी प्रमाणे अनुसूचिमधे नमुद परावैद्यकीय विषयामधे पदवी/पदविका उत्तीर्ण उमेदवारांच्या नोंदणीसाठी विचार करण्यात येतो व विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त महाराष्ट्र राज्यामधील शासनमान्य / विद्यापीठ, मुक्तविद्यापीठ, अभिमत विद्यापीठ आणि शासनमान्य महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, एआयसीटीई पदवी,पदविका प्राप्त केलेला उमेदवार महाराष्ट्र परावैद्यक परिषद नोंदणी देते.

पाठवलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र परावैद्यक परिषदेमध्ये सध्यास्थीतीत अनुसूची नुसार खालील विद्यापीठांची व शिक्षण मंडळां कडून प्राप्त अर्हतांना नोंदणी देणे सुरु आहे.

| अ.क्र. | संस्था/ विद्यापीठ/शिक्षण मंडळाची नावं |
|---|---|
| 1 | DPU Dr.D.Y. PatilVidyapeeth, pune (Deemed Univsersity) ( Under Section 3 of the UGC Act,1956 ) |
| 2 | Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik ( Established by Govt. Of Maharashtra ) |
| 3 | Maharashtra State Board of Technical Education, 49, Kherwadi, Bandra (E) Mumbai. |
| 4 | Shreemati Nathibai Damodar Thackersey, Women's University, Mumbai-400049. |
| 5 | Maharashtra University of Health Sciences, Nashik, India. |
| 6 | Tata Institute of Social Science, Devnar, Mumbai. |

अधिक माहिती परिषदेच्या संकेतस्थलावर उपलब्ध आहे. कृपया ती पहावी.
www.maharashtraparamedicalcouncil.org

(दिशा गुडूळकर)
प्रबंधक